मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
(म्हाडाचा घटक)

म्हाडा

## उपमुख्य अधिकारी/पणन यांचे कार्यालय,
## कक्ष क्र.240 पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा) कलानगर वांद्रे (पूर्व) मुंबई-51

दिनांक :- 17/08/2023

### अर्जदार विजेता प्रथम सूचना पत्र सोडत-2023
### (Winner First Intimation Letter of Lottery -2023)

प्रति,

श्री/श्रीमती : NEETU RAJPAT SHARMA

RAVINDRA SILK MILL COMPOUND NEXT TO CRESCENT SOLITAIRE VIJAY PRINTING A K ROAD
SAKINAKA MUMBAI MUMBAI SUBURBAN MAHARASHTRA 400072

विषय - मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सोडत -2023 योजनेतील सदनिका विजेता अर्जदारास प्रथम सूचना पत्र.
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सोडत -2023 - 412-PAHADI GOREGAON, W MUMBAI- 104-EWS, अर्ज क्र. 1130001050, संकेत क्र.412, प्रवर्ग-GP प्राधान्य क्र. - 245

संदर्भ - 1) योजनेचे नाव - 412-PAHADI GOREGAON, W MUMBAI- 104-EWS

महोदय/महोदया,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक 14/ 08 / 2023 रोजी जाहीर करण्यात आलेल्या संगणकीय सोडतीमध्ये आपण विजेता झालात त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन!!!!

तुमच्या यशस्वी अर्जाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| सोडत | अर्ज क्र. | संकेत क्र. | योजनेचे नाव | सदनिका क्र. | प्रवर्ग | सोडतीचा प्राधान्य क्र | पडताळणीसाठी प्रलंबित कागदपत्रे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| MB-01 2023 | 1130001050 | 412 | 412 PAHADI GOREGAON, W MUMBAI 104 EWS | 2, A, 14, 1403 | GP | 245 | - |

अटी व शर्ती : -

1. गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. याचिका-2019/प्र.क्र.66/गृनिप दिनांक 11 सप्टेंबर, 2019 अन्वये शासकीय गृहनिर्माण योजनेतील घर धारण करित असलेल्या व्यक्तीस त्या किंवा अन्य कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेत दुसरे घर अनुज्ञेय नाही याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

2. अर्जदार म्हाडाच्या इतर मंडळातील सोडतीत विजेता झाला असेल व ती सदनिका अर्जदाराने स्विकारली असेल तर अर्जदाराला वरील तक्त्यातील सदनिकेचा लाभ घेण्यासाठी पूर्वी स्विकृत केलेली सदनिका समर्पित केल्यानंतर मुंबई मंडळ-2023 मधील सदनिकेचा लाभ घेता येईल. तसेच, त्या अर्जदारांच्या सर्व प्रलंबित कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर, त्यांना ताबा पत्र देण्यात येईल.

3. अर्जदार किंवा त्याचे पती / पत्नीने एकापेक्षा जास्त विविध प्रवर्गात / विविध संकेतामध्ये अर्ज केल्यास व त्याचे विविध प्रवर्गात / विविध संकेतांमध्ये एकापेक्षा जास्त अर्ज सोडती मध्ये यशस्वी ठरल्यास त्यांना दोघांना मिळून एकाच प्रवर्गात / एकाच सकेतांकात एकच सदनिका वितरीत करण्यात येईल व अशा परिस्थितीत ज्या दुसऱ्या प्रवर्गामध्ये / सकेतांकामध्ये त्यांनी अर्ज केलेला असेल तेथून त्यांना माघार घ्यावी लागेल. अशा प्रकारे माघार घेतलेल्या सर्व अर्जासाठी त्यांनी भरलेली अनामत रक्कम विनाव्याज, तसेच रु. 1000/- इतकी रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून वजावट करुन परतावा करण्यात येईल.

4. अर्जदारांना सदनिकेकरिता आपली स्वीकृती कळविण्याचा पर्याय त्यांच्या लॉगिन मध्ये दिनांक 17/08/2023 ते दिनांक 27/08/2023 च्या दरम्यान उपलब्ध करुन देण्यात येईल. जे अर्जदार या दिलेल्या वेळेत आपली स्विकृती कळविणार नाहीत त्यांचा यशस्वी ठरलेल्या वरील सर्व सदनिकांवरचा हक्क आपोआप रद्द होईल.

5. अर्जदारांनी आपली स्वीकृती कळविल्यानंतर, प्रलंबित कागदपत्रे ही ताबा घेण्यापूर्वी आपल्या लॉगिन मध्ये अपलोड करावीत. प्रलंबित कागदपत्रांची पडताळणी झाल्याशिवाय ताबा पत्र देण्यात येणार नाही.

6. आरक्षित प्रवर्गातील अर्जदार ज्याचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी झालेली नाही त्यांना जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी झाल्याशिवाय ताबा पत्र देण्यात येणार नाही.

7. अर्जदाराने सदनिका निवडावी व e-sign करुन ती निश्चित करावी व बाकीच्या सदनिका login मध्ये जाऊन समर्पित (Surrender) कराव्यात व अनामत रक्कमेच्या परताव्याची मागणी करावी.

8. सदनिका निश्चित करुन e-sign केल्यानंतर अर्जदाराला तात्पुरते देकार पत्र तयार होऊन अंदाजित विक्री किंमत भरणा करण्यासाठी लॉगिन मध्ये Link उपलब्ध करुन देण्यात येईल.

9. जे अर्जदार देकारपत्र मिळण्यापूर्वी आपली सदनिका परत (Surrender) करतील, अशा अर्जदारांच्या अनामत रक्कमेतून रु.1000/- वजा करुन उर्वरित रक्कम अर्जदारांच्या खात्यावरती जमा करण्यात येईल.

10. जे अर्जदार देकारपत्र मिळाल्यानंतर आपली सदनिका परत (Surrender) करतील, अशा अर्जदारांच्या सदनिकेच्या विक्री किंमतीतून 1% रक्कम किंवा अनामत रक्कम यांपैकी जी रक्कम अधिक असेल ती वजा करुन उर्वरित रक्कम अर्जदारांच्या खात्यावरती जमा करण्यात येईल.

11. काही योजनांना भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) अप्राप्त असून म्हाडा/बृहन्मुंबई महानगर पालिकेडून भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त झाल्यानंतर सदनिका वितरणाची कार्यवाही केली जाईल.

12. सदनिकांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थींना वेळोवेळी म्हाडाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम 1981 , महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम 1981 च्या तरतुदी वेळोवेळी होणा-या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

13. यशस्वी/प्रतिक्षायादीवरील पात्र ठरलेल्या अर्जदारांच्या कागदपत्रांची वाटल्यास फेर तपासणी करण्याचे अधिकार मुख्य अधिकारी,मुं.म. यांना असतील.

14. अर्जदार सोडतीमध्ये यशस्वी ठरल्यानंतर सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदाराने सादर केलेले कागदपत्र/पुरावे / दाखले मुळ प्रती पडताळणीसाठी मागणी केल्यास त्या आपणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मुळ प्रती सादर करणे बंधनकारक असेल त्यामध्ये कसुर केल्यास अथवा सादर केलेली कागद पत्र / पुरावे / दाखले बनावट किंवी चुकीची माहीती दिली असल्याचे निदर्शनास आल्यास अशा अर्जदारावर कायदेशीर कार्यवाही करुन सदनिका ताब्यात घेण्यात येईल व भरणा केलेली संपूर्ण विक्री किंमत समपहरण/ Forfeit केली जाईल.

आपला विश्वासू,

(राजेंद्र गायकवाड)

Signature Not Verified
Rajendra Gangadhar Gaikwad
Dy.CO (Marketing)/MB

उपमुख्य अधिकारी/ पणन/
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

महत्वाच्या दिनांक -

1. सदनिका स्विकृती (Acceptance) /समर्पित (Surrender) करण्याचा कलावधी दि. 17/08/2023 ते दि. 27/08/2023